महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : २५० वा दिनांक : ३०/०७/२०२५ वार : बुधवार

## ऑपरेशन सिंदूर हा केवळ सरकारचा तमाशा : काँग्रेस खासदार प्रणिती शिंदे



**मुंबई :** पहलगाम हल्ला आणि त्यानंतर केंद्राने पाकविरोधात राबवलेल्या ऑपरेशन सिंदूरवर सध्या संसदेत गरमागरम चर्चा सुरू आहे. काँग्रेस खासदास प्रणिती शिंदे यांनी लोकसभेतील या चर्चेत सहभागी होत ऑपरेशन सिंदूर हा सरकारचा तमाशा असल्याचा वादग्रस्त दावा केला. त्यांच्या या विधानाचे आता तीव्र पडसाद उमटत आहेत. त्यांच्या या विधानाविरोधात भाजपने सोलापूरच्या मंगळवेढ्यात जोडे मारो आंदोलन केले.

पाक पुरस्कृत अतिरेक्यांनी जम्मू काश्मीरच्या पहलगाम येथे अतिरेकी हल्ला केला होता. त्यात २५ हून अधिक पर्यटकांचा बळी गेला होता. त्यानंतर भारताने पाकविरोधात ऑपरेशन सिंदूर राबवून पाकिस्तानी अतिरेक्यांचे अड्डे उद्ध्वस्त केले. या कारवाईच्या मुद्यावर सध्या संसदेत गरमागरम चर्चा सुरू आहे. खासदार प्रणिती शिंदे यांनी या चर्चेत सहभागी होत केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारवर निशाणा साधला. त्या म्हणाल्या, ऑपरेशन सिंदूर हे नाव देशभक्तीचे वाटत असेल तरी, हा केवळ सरकारचा प्रसारमाध्यमांवरील एक तमाशा होता. या मोहिमेतून सरकारने काय सिद्ध केले हे अद्याप कुणालाही समजले नाही.

ऑपरेशन सिंदूर मोहिमेद्वारे आपण काय साध्य केले, किती अतिरेक्यांना पकडले, शत्रूने आपली किती विमाने पाडली, या हल्ल्याला कोण जबाबदार होते, त्यात कुणाची चूक होती, दहशतवादी कुठून आले, आपल्या नागरिकांना ठार मारून ते कुठे पळून गेले, याची कोणतीही माहिती सरकारला नाही. सरकारकडे कोणत्याही प्रश्नाचे उत्तर नाही. शेजारी देशावर आक्रमण करायचे आणि त्या नावाने निवडणुकीत लोकांची मते घ्यायची हे यांचे धोरण आहे. यासाठी कुणाचाही बळी गेला तरी यांना काहीच फरक पडत नाही. कारण, आपले पंतप्रधान व सरकार आठवड्यातील सातही दिवस २४ तास निवडणुकीच्या मोडमध्ये असतात.

आपल्या देशाची एवढी कमकुवत प्रतिमा यापूर्वी केव्हाच झाली नव्हती. पण या लोकांमुळे तसे घडले. यांना प्रत्येक गोष्टीचा इव्हेंट करायचा आहे. माझी मोदींना विनंती आहे की, त्यांनी प्रत्येक गोष्टीचा इव्हेंट करणे थांबवावे. त्यांनी मन की बात सोडून जन की बात करावी. जनतेच्या प्रश्नांची उत्तरे देण्याची हिंमत दाखवावी, असे प्रणिती शिंदे म्हणाल्या.

दुसरीकडे, ऑपरेशन सिंदूरला तमाशाची उपमा दिल्याप्रकरणी भाजपने मंगळवेढ्यात प्रणिती शिंदे यांच्या प्रतिमेला जोडे मारो आंदोलन केले. भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष सुदर्शन यादव यांनी या प्रकरणी प्रणिती यांच्यावर टीका केली. प्रणिती शिंदे या सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार आहेत याची आज आम्हाला खंत वाटते. ऑपरेशन सिंदूरला जगाने मान्य केले. त्याला नाकारणे हा देशभक्तांचा व भारतीय सैन्य दलांचा अपमान आहे, असे ते म्हणाले.

काँग्रेसची विचारधारा ही कायम देशाच्या विरोधात राहिली आहे. त्यांचे नेते स्वातंत्र्योत्तर काळापासून सतत देशाविरोधात विधाने करतात. सैन्याच्या कामगिरीच्या विरोधात बोलून लष्कराचा अपमान केला जात आहे. प्रणिती शिंदे यांचे वडील सुशीलकुमार शिंदे यांना भगवा दहशतवाद वाटतो. त्यानंतर आज प्रणिती यांनीही लष्कराचा अवमान केला. या माध्यमातून त्यांनी मतपेटीचे राजकारण करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी लोकसभेत आपल्या मतदारसंघाचे प्रश्न मांडण्याची गरज होती. पण त्या सवंग प्रसिद्धीसाठी तसेच आपल्या पक्षनेतृत्वाला आपण चांगले काम करतो हे दाखवून देण्यासाठी अशी बेताल विधाने करत आहेत, असेही यादव यावेळी म्हणाले.

## परभणी बँकेवर वर्चस्व असणारे सुरेश वरपुडकर यांचा भाजप प्रवेश



**मुंबई :** काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर वर्चस्व असणारे माजी आमदार सुरेश वरपुडकर यांनी आज भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश केला. वरपुडकर यांच्या प्रवेशामुळे परभणी जिल्ह्यात भारतीय जनता पक्षाची ताकद आणखी वाढली आहे. आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या दृष्टीकोनातून हा पक्ष प्रवेश महत्त्वाचा मानला जात आहे.

माजी आमदार सुरेश वरपुडकर यांच्या सोबत परभणी आणि हिंगोली जिल्ह्यातील अनेक पदाधिकारी आणि माजी नगरसेवकांनी भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश केला. 'सबका साथ, सबका विकास आणि सबका प्रयास' या माध्यमातून परभणी जिल्ह्यातील तळागाळातील शेवटच्या माणसापर्यंत विकास पोहोचवण्याचे आवाहन या वेळी भाजपचे प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केले आहे. सुरेश वरपुडकर यांना प्रचंड अनुभव आहे. असे व्यक्ती आमच्याबरोबर हातात घालून नागरिकांच्या आणि जनतेच्या हितासाठी एकत्र येऊन काम करायला लागले तर येणाऱ्या काळ महाराष्ट्रासाठी अत्यंत लाभदायक राहील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

या वेळी भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्यासह मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री अतुल सावे, मंत्री तथा परभणीच्या पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांची देखील प्रमुख उपस्थिती होती. या सर्वांनीच वरपुडकर यांचे पक्षात स्वागत केले आहे. तसेच आगामी काळात परभणी जिल्ह्यात पक्ष अधिक मजबूत करण्याचे आवाहन केले.

मराठवाड्यामध्ये काँग्रेस पक्षाला आणखी एक मोठा धक्का बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे. काँग्रेसचे माजी आमदार आणि प्रदेश उपाध्यक्ष कैलास गोरंट्याल हे भारतीय जनता पक्षाच्या वाटेवर असल्याची माहिती समोर आली आहे. गोरंट्याल हे भारतीय जनता पक्षाच्या बड्या नेत्यांच्या संपर्कात असल्याचे देखील सांगण्यात येत आहे. गोरंट्याल यांनी भाजपमध्ये प्रवेश केला तर मराठवाड्यात काँग्रेस पक्षाला मोठा झटका मानला जाईल. विधानसभा निवडणुकीमध्ये कैलास गोरंट्याल यांना काँग्रेस पक्षाने उमेदवारी दिली होती. मात्र या निवडणुकीत त्यांना पराभव स्विकारावा लागला. या पराभवानंतर गोरंट्याल यांनी विधानसभा निवडणुकीत पक्षांतर्गत पदाधिकाऱ्यांनी विरोधात काम केले असल्याची तक्रार पक्षाकडे केली होती. मात्र त्यांना पक्ष श्रेष्ठींकडून अपेक्षित अशी साथ मिळाली नाही. त्यामुळे त्यांनी या आधीच थेट नाराजी देखील व्यक्त केली होती. तेव्हापासूनच ते भारतीय जनता पक्षात जाणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

## कलंकित मंत्र्यांना गोमूत्र शिंपडून पवित्र करा : वडेट्टीवार

**मुंबई :** राज्याचे कृषिमंत्री शेतकऱ्यांविरोधात विधान करतात, विधी मंडळात कामकाज सुरू असताना रम्मीचा गेम खेळतात आणि सरकार बेजबाबदार मंत्र्यांचा राजीनामा घेत नाही, कृषिमंत्री कोकाटे यांचा राजीनामा न घेणे म्हणजे सरकार शेतकऱ्यांच्या प्रती असंवेदनशील असल्याचे स्पष्ट झाले, असा आरोप काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.

मुंबईत पत्रकार परिषदेला संबोधित करताना वडेट्टीवार म्हणाले, राज्याचे गृहराज्यमंत्री डान्सबार चालवतात, एका मंत्र्यांकडे पैश्याचा बॅगा सापडतात पण तरीही यांची पाठराखण जर करण्यात येत असेल तर या सर्व मंत्र्यांवर गोमूत्र शिंपडून त्यांना पवित्र करून घ्यावे. लाडकी बहिण म्हणायचे आणि बारमध्ये बहिणींना नाचवायचे असा किळसवाणा प्रकार महाराष्ट्राच्या राजकारणात कधी झाला नव्हता, अशी टीका विधिमंडळ नेते वडेट्टीवार यांनी केली. नागपूर मधील बार मध्ये अधिकारी फाईली घेऊन बसतात, गडचिरोलीचे ते अधिकारी असल्याची माहिती समोर येते. गडचिरोलीचे पालकमंत्री मुख्यमंत्री आहेत, असा कारभार सुरू असल्याची टीका वडेट्टीवार यांनी केली.

एकीकडे शेतकरी आत्महत्या करत आहे, कंत्राटदार आत्महत्या करत आहे बिल थकली आहेत. राज्यातील शेतकऱ्यांची बँकाकडे ३५ हजार कोटींची थकबाकी आहे. शेतकरी आता कर्ज घेऊ शकणार नाही, शेतकरी अडचणीत आला आहे पण सरकारला त्याचे देणेघेणे नाही. शक्तिपीठ महामार्गाला शेतकरी विरोध करत आहे, तरी त्या महामार्गासाठी सरकार पैसे द्यायला तयार आहे पण शेतकरी कर्जमाफी मागत आहे त्यासाठी सरकार तयार नाही, अशी टीका वडेट्टीवार यांनी केली.

महायुती सरकारमध्ये शीतयुद्ध सुरू आहे. बाहेरून दाखवायला सगळ सुरळीत आहे पण आतून प्रचंड असंतोष आहे. या सरकारमधील दोन पक्षांना सत्तेत टिकून रहायचे म्हणून तोंड दाबून मुका मार सहन करत आहे अशी टीका विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ३० जुलै २०२५


## कालिकादेवी विद्यालयात 'वृक्षलागवड मोहिम' विषयी बैठक संपन्न





**शिरूर कासार :** दि.२८ जुलै २०२५ रोजी कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात, गटशिक्षणाधिकारी कार्यालय,पंचायत समिती,शिरूर (का.) मार्फत मा.जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी,बीड यांनी आदेशीत केल्या प्रमाणे शिरूर (का.) तालुक्याचे तहसिलदार मा.सुरेश घोळवे साहेब यांनी आदेशीत केल्याप्रमाणे "ऑगस्ट २०२५ मध्ये एकाच दिवशी वृक्षलागवड मोहिम राबविणे",अंतर्गत बैठक संपन्न झाली.या वृक्षलागवड मोहिम बैठकीचे अध्यक्ष मा.प्रशांत शिंदे (गटशिक्षणाधिकारी,शिरूर का.) यांच्या अध्यक्षतेखाली कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तथा वरिष्ठ महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात पार पडली.

या बैठकीला प्रमुख अतिथी म्हणून तहसिलदार मा.सुरेश घोळवे साहेब,तर बैठकीचे अध्यक्ष म्हणून श्री प्रशांत शिंदे साहेब,व विशेष मान्यवर म्हणून प्राचार्य केशव भांगे साहेब,प्राचार्य डाॅ.विश्वास कंधारे साहेब,मुख्याद्यापक संभाजी सोनवणे,मुख्याद्यापक जी.एन.खेडकर प्रसिध्द कवी अनंत कराड,श्री शिवलिंग परळकर यांची विशेष उपस्थिती होती.

यावेळी कालिकादेवी विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेबांनी तहसिलदार मा.सुरेश घोळवे साहेब यांचा शाॅल, श्रीफळ, व बुके देऊन सत्कार करण्यात आला.व प्राचार्य डाॅ.विश्वास कंधारे साहेबांनी गटशिक्षणाधिकारी मा.प्रशांत शिंदे साहेब यांचा ही शाॅल,श्रीफळ व बुके देऊन सत्कार करण्यात आला.त्यानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा.प्रशांत शिंदे यांनी केले तर तहसिलदार मा.सुरेश घोळवे साहेब यांनी 'ऑगस्ट २०२५ मध्ये एकाच दिवशी वृक्षलागवड मोहिम राबविणे',याविषयी मार्गदर्शन करतांना सांगितले की, "पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आपल्या सर्वांचा हातभार लागला पाहिजे.

तसेच आपल्या वसुंधरेचे संवरक्षण केले पाहिजे, आणि ऑगस्ट २०२५ मध्ये सर्व केंद्रप्रमुखांनी,मुख्याद्यापकांनी, शाळेचे प्रतिनिधी,शिक्षक,व विद्यार्थी या सर्वांनी एकाच दिवशी वृक्षलागवड या राष्ट्रीय उपक्रमात प्रत्येकानेच योगदान दिले पाहिजे.म्हणून प्रत्येक शाळेने ऑगस्ट महिण्यात एकाच दिवशी वृक्षलागवड मोहिम राबवून यशस्वी करावी. असा आदेश बैठकीतून देण्यात आला.

यावेळी शिरूर का. तालुक्यातील सर्व केंद्रप्रमुख,प्राचार्य /मुख्याद्यापक,केंद्रीय मुख्याद्यापक व प्रतिनिधी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या बैठकीचे सूत्रसंचालन मु/अ.संभाजी सोनवणे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.डाॅ.अशोक घोळवे सर यांनी केले.

शेवटी कालिकादेवी विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेबांनी विद्यालयात बैठकीची उत्तम व्यवस्था उपलब्ध करून दिली त्याबद्दल गटशिक्षणाधिकारी प्रशांत शिंदे यांनी कार्यालयाच्या वतीने मन:पूर्वक आभार मानले.

## सहा लाख आया-बहिणींचे सिंदूर तुम्हाला दिसत नाही का? बच्चू कडू

**मुंबई :** पहलगाम येथे झालेल्या अतिरेकी हल्ल्यानंतर भारतीय सैन्याने ‘ऑपरेशन महादेव’ राबवत दोन दहशतवाद्यांचा खात्मा केला. या पार्श्वभूमीवर बोलताना आमदार बच्चू कडू यांनी केंद्र सरकारवर आणि भाजपवर जोरदार हल्ला चढवला. "धर्माच्या नावाखाली २८ लोकांसाठी सिंदूर यात्रा काढली जाते, पण ६ लाख शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, तरी त्यावर सरकार एक शब्द बोलायला तयार नाही," अशी टीका त्यांनी केली.

जम्मू आणि काश्मीरमध्ये, अमरनाथ यात्रेदरम्यान, ऑपरेशन महादेव अंतर्गत, सैन्याने पहलगाम हल्ल्याच्या मास्टरमाइंडसह तीन दहशतवाद्यांना ठार मारले. श्रीनगरमधील दाचीगामच्या वरच्या भागात झालेल्या भीषण चकमकीत मारले गेलेले तीन दहशतवादी लष्कर-ए-तोयबाचे असल्याचे सांगितले जात आहे. या पार्श्वभूमीवर आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरून प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी सरकारवर उपरोक्त टीका करत सरकारवर जोरदार हल्ला चढवला आहे.

धर्माचे नाव देऊन २८ लोकांसाठी सिंदूर यात्रा काढतात, मात्र ६ लाख शेतकरी आत्महत्या करून मरत आहेत, त्याची चर्चाही करायला सरकार तयार नाही. त्यांना देवी-देवतांचे फक्त नाव वापरायचे आहे. लोकांना धर्मामध्ये गुंतून ठेवायचे आहे, पण तो महादेवाचा त्रिशूल शेतकऱ्याच्या छाताड्यात खूपसायचा अशी अवस्था आणली आहे, अशी जहरी टीका बच्चू कडू यांनी सरकारवर केली आहे.

"सहा लाख हिंदू मातांनी, बहिणींनी आपले सिंदूर गमावले, त्यावर पंतप्रधान मोदी किंवा मुख्यमंत्री फडणवीस एक शब्द बोलत नाहीत. श्रद्धांजली तरी द्यावी, एवढंही त्यांच्या मनात येत नाही. मात्र २८ लोकांसाठी सिंदूर यात्रा काढली जाते. सहा लाख मरणाऱ्या शेतकऱ्यांसाठी तो सिंदूर कुठे गेला? त्यांचे सिंदूर तुम्हाला दिसत नाही का? असा सवाल करत याहून मोठे दुर्दैव काय?" असे बच्चू कडू म्हणाले.

राजकीय घडामोडींवर भाष्य करताना बच्चू कडू म्हणाले, "हा संपूर्ण खेळ भाजपचा आहे. सर्व घटक पक्षांवर दबाव ठेवण्याचे हे राजकारण आहे. नुकताच अमित शहांचा फोन उद्धव ठाकरे यांच्या खासदाराला वाढदिवसाच्या शुभेच्छांसाठी गेला. उद्धव ठाकरेंनाही वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. हे सगळे नितीश कुमार किंवा चंद्रबाबू नायडू यांनी केंद्रात काही हालचाल करू नये, यासाठी अप्रत्यक्ष इशारा देण्याचा प्रयत्न आहे."

"तुम हट गये, तो मेरे पास पवार आणि ठाकरे आहेत, असे सगळे सूचकपणे दाखवण्याचा प्रयत्न सध्या भाजपकडून सुरू आहे. याचा अर्थ असा नाही की, शरद पवार किंवा उद्धव ठाकरे भाजपसोबत जाणार, पण त्याचा आभास निर्माण केला जातोय," असेही बच्चू कडू म्हणाले.

भाजपकडून सध्या संभ्रमाचे वातावरण तयार केले जात आहे. जनतेला नेमके काय घडतंय हेच कळू नये, हा यामागचा उद्देश आहे. मित्र पक्षांवर दबाव आणून त्यांना नको त्या वाटेवर आणण्याचा हा डाव आहे, असा गंभीर आरोपही बच्चू कडू यांनी केला.







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ३० जुलै २०२५


## गरजूंना शोधून मदत करणारी सेवाभावी संस्था म्हणजे रोटरी : आमदार प्रविण स्वामी

### रोटरी क्लब मुरूम सिटी चा पदग्रहण सोहळा थाटात.....




मुरुम, ता. उमरगा येथील रोटरी पदग्रहण सोहळ्याप्रसंगी नूतन अध्यक्ष आप्पासाहेब सूर्यवंशी, सचिव कल्लप्पा पाटील, कमलाकर मोटे, सुनिल राठोड व सर्व पदाधिकारी यांचा सत्कार करताना बापूराव पाटील, प्रदिप मुंडे, श्रीराम देशपांडे.

**मुरूम (प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले)** : जागतिक पातळीवर रोटरीने सामाजिक क्षेत्रात आपली सेवाभावीवृत्ती कायम जोपासली आहे. ही सेवाभावीवृत्ती निश्चितच माणसाला प्रेरणा देणारी आहे. समाजातील गरीब, दुर्लक्षित, पीडित गरजूंना शोधून मदत करणारी सेवाभावी संस्था म्हणजे रोटरी होय असे प्रतिपादन आमदार प्रविण स्वामी यांनी केले. मुरूम येथील रत्नमाला मंगल कार्यालयात रविवारी (ता. २७) रोजी आयोजित रोटरीचा पदग्रहण सोहळ्याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील होते.

प्रमुख अतिथी उमरगा-लोहारा तालुक्याचे आमदार प्रविण स्वामी, पदग्रहण अधिकारी सहाय्यक प्रांतपाल प्रदिप मुंडे, लातूरचे सहाय्यक प्रांतपाल श्रीराम देशपांडे, रोटरीचे नूतन अध्यक्ष प्रा. डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी, नूतन सचिव कलाप्पा पाटील, माजी अध्यक्ष कमलाकर मोटे, सचिव सुनिल राठोड आदींची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी दीप प्रज्वलन व कुंडीतील रोपट्याला पाणी घालून मान्यवरांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी सौ. अलका नंदकिशोर लोहिया, कोथळीकर यांच्या सौजन्याने पाच गरीब महिलांना शिलाई मशीन, दहा विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, पाच स्कॉलरशिपच्या विद्यार्थ्यांना पुस्तक संचाचे मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

याप्रसंगी नूतन सदस्यांचा मान्यवरांच्या हस्ते रोटरीची पिन लावून सत्कार करण्यात आला. नूतन अध्यक्ष सूर्यवंशी यांनी पुढील वर्षभरातील नियोजन व उपक्रमाचा संकल्प करून माझ्या बोर्ड ऑफ डायरेक्टरची ओळख करून देऊन त्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार घडवून आणला.

याप्रसंगी अॅड. उदय वैद्य यांना नोटरी लायसन्स व कुमारी श्रावणी सूर्यवंशी हिचा वाढदिवसानिमित्ताने मान्यवरांनी सत्कार केला.

प्रदिप मुंडे मार्गदर्शन करताना म्हणाले की, समाजातील वंचित व दुर्बल घटकांचे हित जोपासण्यासाठी रोटरी क्लब सारखी संस्था जगभर काम करते. ते अत्यंत कौतुकास्पद स्वरूपाचे आहे. त्यांनी रोटरीच्या प्रांतपाल यांचा शुभ संदेश वाचून पुढील नूतन कार्यकारणीला मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

सहाय्यक प्रांतपाल श्रीराम देशपांडे यांनी रोटरीत काम करताना जो आनंद मिळतो. तो आनंद इतर दुसऱ्या कुठल्याही कामापेक्षा निश्चितच मोठा असतो. रोटरीत मैत्रीपूर्ण संबंध निर्माण होतात. जे आयुष्यभर जोपासले जातात. गोविंद पाटील, डॉ. विजयानंद बिराजदार, डॉ. नितीन डागा, डॉ. महेश स्वामी, उल्हास घुरघुरे, धनराज मंगरुळे, प्रकाश रोडगे, कल्लय्या स्वामी, आप्पासाहेब पाटील, उदय वैद्य, भूषण पाताळे, मल्लिकार्जुन बदोले, शरणाप्पा धुम्मा, राजेंद्र वाकडे, शिवकुमार स्वामी, बबनराव बनसोडे, अमित पोतदार आदींनी पुढाकार घेतला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. महेश मोटे यांनी केले. सूत्रसंचालन संतोष कांबळे तर आभार कल्लप्पा पाटील यांनी मानले. शहर व परिसरातून विविध क्षेत्रातील नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

## संतोष (अण्णा) सुरडकर यांना भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम राष्ट्रीय समाजरत्न पुरस्कार २०२५ प्रदान




**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी):-** ए.डी. फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य् यांच्या वतीने दि. २६ जुलै रोजी ग. दि. माडगूळकर नाट्यगृह, पुणे येथे आयोजित भारतरत् डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम जीवन गौरव / समाजरत्न पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात संपन्न झाला.

या गौरव सोहळयात समाजिक कार्य करीत असतांना "ज्याला कोणी नाही, वाली त्याला कृपाळू वृद्धाश्रमांची सावली" या ब्रीद व्याक्याप्रमाणे २५-३० वृद्ध आजी- आजोंबाचा मोफत सांभाळ करणारे कृपाळ वृद्धाश्रमाचे संस्थापक अध्यक्ष संतोष (अण्णा) सुरडकर यांना "भारतरत् डॉ.ए. पी. जे. अब्दुल कलाम राष्ट्रीय समाजरत् पुरस्कार" २०२५ प्रदान करण्यात आला.

सदरील कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून तुकाराम बाबा महाराज (मठाधिपती - संत बागडे बाबा आश्रम) मा. वैशाली मार्तंड चव्हाण (सहाय्यक आयुक्त मनपा पुणे.) ए.डी. फाऊंडेशन चे अध्यक्ष अशोक गोराड सर व इतर मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ३० जुलै २०२५

# मंत्रिमंडळ बैठकीत वादग्रस्त मंत्र्यांना मुख्यमंत्र्यांचा इशारा



**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाची बैठक आज झाली. या बैठकीमध्ये विविध महत्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. मात्र, बैठकीला वादग्रस्त मंत्री माणिकराव कोकाटे यांची उपस्थिती हा चर्चेचा विषय राहिला आहे. राज्यात महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे तात्काळ निकाली काढण्यासाठी गोंदिया, रत्नागिरी आणि वाशीम येथे विशेष न्यायालय स्थापन करण्याचा निर्णय या बैठकीमध्ये घेण्यात आला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रिमंडळ बैठकीमध्ये महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. मात्र बैठकीनंतर सर्व अधिकारी सभागृहातून बाहेर पडले. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी सर्व मंत्र्यांचा चांगलाच क्लास घेतला. यावेळी वादग्रस्त मंत्र्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कडक शब्दात इशारा दिला आहे.

या पुढे वादग्रस्त मंत्र्यांचा एकही प्रकार खपवून घेणार नसल्याचे फडणवीस यांनी म्हटले आहे. ही अखेरचा संधी असल्याचे देखील फडणवीस यांनी मंत्र्यांना सांगितले आहे. मंत्रिमंडळ बैठक संपल्यानंतर वीस मिनिटे मुख्यमंत्र्यांनी सर्व मंत्र्यांचा चांगलाच क्लास घेतला. यावेळी त्यांनी वादग्रस्त वक्तव्य करणाऱ्या मंत्र्यांचे कान टोचले आहेत.

मंत्रिमंडळ बैठकीत वादग्रस्त मंत्री माणिकराव कोकाटे यांची उपस्थिती बाहेर चर्चेचा विषय ठरली होती. माणिकराव कोकाटे यांचा तात्काळ राजीनामा घ्यावा, यासाठी विरोधी पक्षाने राग उठवले आहे. त्यामुळे आज ते राजीनामा देतील अशी शक्यता वर्तवली जात होती. बैठकीआधी त्यांनी अजित पवार यांना दालनात उपमुख्यमंत्र्यांसोबत चर्चा केली. यावेळी दोघांमध्ये एक तास चर्चा चालली. मात्र त्यानंतर कोकाटे थेट मंत्रिमंडळाच्या बैठकीसाठी दाखल झाले. यावेळी प्रसार माध्यमांनी विचारलेल्या कोणत्याही प्रश्नाला कोकाटे यांनी उत्तर दिले नाही.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन
महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर
अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा..
अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.
Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

# हा माणूस दुसऱ्यांसारखा गद्दार नाही : जितेंद्र आव्हाड



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेनेच्या एका युवानेत्याच्या वाढदिवसाला हजेरी लावत त्याचे कोडकौतुक केले आहे. हा नेता इतरांसारखा गद्दार नसल्याचे नमूद करत त्यांनी पक्षाला सोडचिठ्ठी देणाऱ्या इतर नेत्यांना टोला हाणला आहे.

जितेंद्र आव्हाड हे कळवा - मुंब्रा मतदारसंघाचे विधानसभेत नेतृत्व करतात. येथे पूर्वी राष्ट्रवादीची ताकद होती. पण एकनाथ शिंदे यांनी येथील काही नगरसेवकांना फोडून राष्ट्रवादीला हादरा दिला. यामुळे दुखावलेल्या आव्हाड यांनी शिंदे गटाचे युवा नेते मंदार केणी यांच्या वाढदिवसाला उपस्थित राहून त्यांना शुभेच्छा दिल्या. तसेच ते दुसऱ्यांसारखे गद्दार नसल्याचेही स्पष्ट केले. मंदार केणी हे ठाणे महापालिकेच्या माजी विरोधी पक्षनेत्या प्रमिला केणी व कळव्यातील दिवंगत ज्येष्ठ नेते मुकुंद केणी यांचे सुपुत्र आहेत. शिंदे गटात जाण्यापूर्वी मंदार हे राष्ट्रवादीचे ठाणे शहर युवाध्यक्ष होते.

जितेंद्र आव्हाड त्यांचे कौतुक करताना म्हणाले, मंदार केणी व माझी मैत्री अजूनही कायम आहे. ते शिंदे गटात गेल्यानंतरही आमच्या मैत्रीपूर्ण संबंधांत कटूता आली नाही. कारण, मैत्री निखळ व स्वच्छ असली की, त्यात दुरावा येत नाही. मंदार हा स्पष्ट होता. तो इतरांसारखा गद्दार नव्हता. त्याने माझ्यासोबत राहून आतून कलकांड्या केल्या नाही. तो खासदार श्रीकांत शिंदे यांचा मित्र होता. त्यानंतरही त्याने माझ्याशी कधी गद्दारी केली नाही. तो माझ्या जवळच्या माणसांपैकी एक असल्याचे श्रीकांत शिंदे यांनाही ठावूक होते. पण बदलत्या राजकीय परिस्थितीमुळे त्याला पक्ष सोडण्याचा निर्णय घ्यावा लागला. पण पक्ष सोडताना तो मला सांगून गेला.

जितेंद्र आव्हाड यांनी यावेळी केणी कुटुंबाच्या बाबतीत आपली मोठी चूक झाल्याचेही प्रांजळपणे मान्य केले. मी केणी कुटुंबाला दूर ठेवले आणि दुसऱ्या कुटुंबाला जवळ केले. त्यांच्यावर अतिविश्वास ठेवला. ही माझ्या आयुष्यातील सर्वात मोठी चूक झाली. हे कुटुंब मला नेहमीच केणी कुटुंबीयांविषयी काही ना काही सांगायचे. त्यांच्यावर कारवाई कशी करता येईल हे ही सांगायचे. पण राजकारण असे करायचे नसते. साथ द्यायची असेल तर ती मृत्यूपर्यंत द्यायची. मनोहर साळवी यांच्याविषयी मला आदर आहे. हा आदर आजही आहे आणि उद्याही राहील.

पण ज्यांनी माझ्याजवळ राहून जवळ असल्याचे नाटक करून माझा गळा दाबला त्यांच्याविषयी न बोललेले बरे, असे जितेंद्र आव्हाड म्हणाले.

उल्लेखनीय बाब म्हणजे जितेंद्र आव्हाड आमदार असलेल्या कळवा-मुंब्रा मतदारसंघात भाजपची अवस्था अगदीच तोळामासा आहे. हा मतदारसंघ एकनाथ शिंदे यांचे खासदार पुत्र डॉक्टर श्रीकांत यांच्या लोकसभा मतदारसंघाचा भाग आहे. त्यामुळे या ठिकाणचे बहुसंख्य नगरसेवक आपल्या पक्षात कसे येतील यासाठी त्यांनी पद्धतशीर व्युहरचना आखत होते. ही घडामोड सुरू असताना भाजपनेही या मतदारसंघातील आव्हाड समर्थक नगरसेवकांवर लक्ष केंद्रीत केले होते. पण त्यात शिंदे गटाने बाजी मारली.

आमदार जितेंद्र आव्हाड यांचे निकटवर्तीय समजले जाणारे माजी नगरसेवक मिलिंद पाटील, त्यांची पत्नी मनाली पाटील, माजी विरोधी पक्ष नेत्या प्रमिला केणी, महेश साळवी, त्यांच्या पत्नी मनिषा साळवी, सुरेखा पाटील, सचिन म्हात्रे यांच्यासह मंदार केणी यांच्यासह पक्षातील काही पदाधिकाऱ्यांनी मुंबईतील मलबार हिल येथील मुक्तागिरी बंगला येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत पक्ष प्रवेश केला होता. या नगरसेवकांना आपल्या पक्षात घेत शिंदेंनी अजित पवार व भाजपलाही आगामी महापालिका निवडणुकांच्या तोंडावर सूचक असा संदेश दिला होता.